# ९. महिलांवरील अत्याचाराबाबत

महिलांवरील अत्याचार प्रतिबंधाच्या संदर्भात व महिलांना सन्मानपूर्वक वागविण्याविषयी खालीलप्रमाणे कार्यवाही पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून करण्यात येईल.

(अ) महिलांच्या व मुलींच्या तक्रारीबाबत पोलिसांकडून तावडतोब चौकशी, तपास करून आरोपींना तावडतोब अटक करण्यात येईल. तसेच त्यांच्यावर लगेच कायदेशीर व प्रतिबंधक कारवाई करण्यात येईल. सदरहू तक्रारीमध्ये व्यवस्थित पुरावा गोळा करून तपासात काहीही विसंगती न ठेवता लवकरात लवकर अभियोग न्यायालयात दाखल करण्यात येईल.

(ब) (१) ज्या वेळेस महिलांना अटक करण्याची वेळ येईल, किंवा महिला साक्षीदाराकडे विचारपूस करण्यात येईल, त्यावेळी महिला पोलीस अधिकारी/कर्मचारी बंदोबस्तास ठेवणे बंधनकारक आहे.

(२) चौकशीचे व तपासाचे कामी महिला साक्षीदारांचे जबाब त्यांच्या घरी जाऊनच घेण्यात येतात. तसेच चौकशी किंवा तपासादरम्यान प्रश्न/माहिती विचारताना ती त्यांना लज्जा वाटेल, त्यांचा अपमान होईल, त्यांच्या चारित्र्याबद्दल शंका निर्माण होईल किंवा एकूणच त्यांच्या प्रतिष्ठेला बाधा येईल असे प्रश्न विचारता कामा नये.

(३) महिलांना व मुलींना जर अटक करावयाची असेल तर त्यांना सुर्यास्तानंतर व सुर्योदयापूर्वी अटक करण्यात येत नाही, पोलीस ठाण्यावर आणले जात नाही मात्र अत्यंत जरुरीचे असल्यास अपवादात्मक परिस्थितीत पोलीस ठाण्याला आणल्यास त्यांच्या नातेवाईकांना त्यांच्या सोबत रहाण्याची परवानगी देणे बंधनकारक आहे.

(४) महिला आरोपितांना त्यांच्यासाठी राखून ठेवलेल्या कक्षात ठेवले जाते. स्वतंत्र कक्ष नसल्यास अभ्यागत कक्षात ठेवले जाते. त्यांना पुरुष कोठडीत ठेवण्यात येवू नये.

(क) बलात्काराला बळी पडलेल्या स्त्रियांच्या मनःस्थितीचा विचार करून, त्यांना सभ्यतेने व दयाळूपणे वागविण्यात येते. तसेच त्यांचे जबाब घेताना असभ्य, अशिष्ट किंवा अश्लील भाषेचा वापर करण्यात येऊ नये. अशा स्त्रियांचे जबाब महिला पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे समक्ष नोंदविण्यात येतात.

(ड) विवाहीत महिलांच्या संशयित मृत्यूप्रकरणी सहाय्यक पोलीस आयुक्त/ उप-विभागीय पोलीस अधिकारी हे भेट देऊन मृत्यूची कारणमीमांसा करतील.